|| अंतरी पेटवू ज्ञानज्योत ||

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव

# Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

## संलग्नता विभाग

जा.क्र.कबचौउमवि/०५/संलग्नता/५१८/२०१८ दि. २८/०९/२०१८

प्रति,

मा.प्राचार्य/संचालक,

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाशी

संलग्नीत सर्व महाविद्यालये व मान्यताप्राप्त परिसंस्था यांना..

**विषय :-** शैक्षणिक वर्ष २०१९-२० करीता विस्तारांचे प्रस्ताव सादर करणे संदर्भात....

महोदय/महोदया,

शैक्षणिक वर्ष २०१९-२० करीता महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ मधील कलम १०७ नुसार नवीन महाविद्यालये व विस्तारांचे प्रस्तावांबाबत नमूद करुन विद्यापीठाचा पंचवार्षिक बृहत आराखडा तयार करण्यात आला होता व त्यास अनुसरुन नवीन महाविद्यालये व विस्तारांच्या प्रस्तावा संदर्भात वार्षिक योजना तयार करण्यात आली होती. सदर योजनेच्या अनुषंगाने भाग-२ नुसार विस्तारांचे प्रस्ताव स्विकारण्यात येत होते. भाग-२ मध्ये ज्या बाबी समाविष्ट नाहीत त्यांचे प्रस्ताव स्विकारण्यात येत नव्हते. वरील बाबत दि. २८/०९/२०१८ रोजी झालेल्या निर्णयानुसार विस्तारांचे प्रस्ताव सादर करणे संदर्भात खालीलप्रमाणे कळविण्यात येत आहे.

०१) शैक्षणिक वर्ष २०१९-२० साठी नवीन अभ्यासक्रम, नवीन विषय, विद्याशाखा व अतिरीक्त तुकडी यांचे संदर्भात यापूर्वी प्रसिध्द करण्यात आलेल्या बृहत विकास आराखडा भाग-२ मध्ये नमूद केलेल्या बाबीं व्यतिरीक्त विस्तारांचे प्रस्ताव सादर करावयाचे असल्यास सदरचे प्रस्ताव संलग्नीत महाविद्यालयांना सादर करता येतील.

०२) महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ मधील कलम १०९ मध्ये नमूद केल्यानुसार नवीन महाविद्यालये तसेच विस्तारांचे प्रस्ताव दि. ३० सप्टेंबर पूर्वी स्विकारण्याची तरतूद नमूद केलेली आहे. तथापि, दि. ३० सप्टेंबर २०१८ रोजी रविवार येत असल्यामुळे दि. ३० सप्टेंबर, २०१८ रोजी प्रस्ताव स्विकारण्यात येतील. तसेच, दि. ०१ ऑक्टोबर २०१८ रोजी देखील दि. ३० सप्टेंबर २०१८ या तारखेचा धनादेश/धनाकर्ष असल्यास प्रस्ताव स्विकारण्यात येतील.

०३) महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ मधील कलम ११२ नुसार खाजगी कौशल्य शिक्षण प्रदाता परिसंस्थेस मान्यता देण्याच्या कार्यपध्दतीच्या अनुषंगाने खाजगी कौशल्य शिक्षण प्रदाता परिसंस्थांच्या मान्यतेबाबतचे प्रस्ताव विद्यापीठामार्फत स्विकारण्यात येतील.

(कृ.मा.प.)

०४) खाजगी कौशल्य शिक्षण प्रदाता परिसंस्थांच्या मान्यतेबाबतचे प्रस्ताव सादर करण्यासाठी Application Fee रु. २५००/- व Profile Fee रु.२५००/- आकारण्यात आलेली असून, संलग्नता शुल्काबाबत जो निर्णय होईल तो आपणास यथावकाश कळविण्यात येईल व त्यानुसार शुल्क स्विकारण्यात येईल.

०५) खाजगी कौशल्य शिक्षण प्रदाता परिसंस्थांचे प्रस्ताव ऑफलाईन स्विकारण्यात येतील.

०६) ज्या महाविद्यालयांनी विस्ताराचे प्रस्ताव यापूर्वी सादर केलेले आहेत त्यांना पुनश्च विस्ताराचे प्रस्तावांचे अर्ज सादर करावयाचे असल्यास त्यांना पूर्वीचा प्रस्ताव Unlock करुन देण्याची सुविधा उपलब्ध करुन देण्यात येईल.

**आपला विश्वासू,**

**Sd/-**

(प्रा.डॉ.पी.पी.माहुलीकर)

**प्र-कुलगुरु**